# नवी मुंबई महानगरपालिका

## जाहिर आवाहन

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील ज्या पथविक्रेत्यांनी त्यांचे भ्रमणध्वनी क्रमांक (Mobile No.) आधारकार्डशी लिंक न केल्यामुळे त्यांचे जीआयएस बेसड् डिजीटल बायोमेट्रीक सर्वेक्षण होऊ शकले नाही, अशा नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील पथविक्रेत्यांना त्यांचे भ्रमणध्वनी क्रमांक (Mobile No.) आधारकार्डशी लिंक करणेबाबत याव्दारे पुनश्च: जाहिर आवाहन करण्यात येत आहे. याची सर्व विभाग कार्यालयांमध्ये नाममात्र शुल्क आकारुन सुविधा दिली जाते. जे पथविक्रेते त्यांचे भ्रमणध्वनी क्रमांक (Mobile No.) आधारकार्डशी लिंक करणार नाहीत, व त्यामुळे त्यांचे जीआयएस बेसड् डिजीटल बायोमेट्रीक सर्वेक्षण न झाल्यास त्यास नवी मुंबई महापालिका जबाबदार राहणार नाही.

तसेच ज्या पथविक्रेत्यांचे यापुर्वी जीआयएस बेसड् डिजीटल बायोमेट्रीक सर्वेक्षण झालेले आहे, त्यांनी आवश्यक ती कागदपत्र दिनांक 15/02/2018 पासून संबंधित विभाग कार्यालयात जमा करावीत, असे याव्दारे जाहिर आवाहन करण्यात येत आहे.

**ठिकाण :- सीबीडी,बेलापूर**
**दिनांक :- 03/02/2018**

**उप आयुक्त (परवाना)**
**नवी मुंबई महानगरपालिका**